Literacy for a Billion

Movie: Vishwavinayak
Year: 1994

Song: Anya nase tujvachun koni
Lyricist: Sanjay Upadhyay

अन्य नसे तुजवाचून कोणी
भाग्यविधाता भक्तीचा
आ...
तुझीच करणी तुझीच माया
तूच भाव शिवशक्तीचा
आ...
अहंकार ही हरला जेथे
गर्व सरे अभिमानाचा
आ...
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा

आ...
आ...
श्रद्धे संगे पुण्य राहते
संशय दारी पाप भीती
आ...
भाव नांदतो मनात तैसा
देव दिसे नयना पुढती
आ...
भक्तीपोटी ज्ञान जन्मता
अर्थ जाणला दैवाचा
आ...
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा

आ...
आ...
आज लागाला शोध
जाहला बोध ईश्वरी सत्याचा
आ...
तुझ्याच पायी येई शेवटी
प्राण प्राण प्रत्येकाचा
आ...
विश्वव्यापका जगन्नायका
तूच श्वास चैतन्याचा
आ...
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा
मंगलमूर्ती मोरया
घोष रे तव नामाचा

विश्वविनायक मोरया
वरदविनायक मोरया
बल्लाळेश्वर मोरया
मयुरेश्वरा मोरया
सिद्धिविनायक मोरया
विघ्नेश्वरा मोरया
गिरिजात्मजा मोरया
लंबोदरा मोरया
भालचंद्रा मोरया
गणाधिपती मोरया
श्रीगणराया मोरया
विश्वविनायक मोरया
मंगलमूर्ती मोरया

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

मोरया मोरया मंगलमूर्ती मोरया
मोरया मोरया मंगलमूर्ती मोरया

मोरया मोरया मंगलमूर्ती मोरया
मोरया मोरया मंगलमूर्ती मोरया

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*